201

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# गॅसकिट वाटप मूल्यमापन अहवाल



२००९-१०

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

२८ क्वीन्स् गार्डन, पुणे ४११ ००१.

# गॅसकिट वाटप
# मूल्यमापन अहवाल

## एक्षेविका
## २००९ - १०

# प्रस्तावना

आदिवासी जमातीची कुटुंबे प्रामुख्याने डोंगराळ व दुर्गम भागात रहात असून त्यांचा जंगलाशी जवळचा संबंध असतो. जळणासाठी त्यांच्याकडून लाकूडफाट्याचा उपयोग करण्यात येतो. तेव्हा अशा दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांकडून होणारी वृक्षतोड, लाकूडतोड, थांबविण्यासाठी राज्य शासनाकडून धोरणात्मक निर्णय घेऊन गॅस सिलेंडर शेगडीसह जोडणी करून देण्याची योजना राबविण्यात आलेली आहे.

सदर योजनेचा दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबांना कितपत फायदा झाला तसेच त्यामुळे होणारी जंगलतोड खरोखरच कमी झाली का याचे मूल्यमापन करण्यासाठी पाहणी करण्यात आली.

सदर पाहणीसाठी श्रीमती अे. एस. काळे, (प्र. उपसंचालक), श्री. यु. एम. यादव, आरेखक, श्री. आर. एस. पवार, अन्वेषक, श्रीमती सुप्रिया चव्हाण, संशोधन सहाय्यक, श्री. सोमनाथ कांबळे, संशोधन सहाय्यक यांनी काम केले असून अहवाल लेखनाचे काम श्रीमती काळे, (प्र. उपसंचालक) यांनी पूर्ण केले आहे.

सदर योजनेचे उद्दिष्ट पूर्ण झाले किंवा कसे हे पडताळण्यासाठी तसेच योजना चालू ठेवण्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी या मूल्यमापन पाहणीचा उपयोग होईल असे वाटते.

**(डॉ. ए. के. झा)**
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

# - अनुक्रमणिका -


| प्रकरण | तक्ता क्रमांक | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | | **प्रस्तावना** | |
| १. | | गॅस किट वाटप योजनेच्या मूल्यमापनाचा उद्देश | १ |
| २. | | कार्यपद्धती | २ |
| ३. | | पृथःकरण | ३ |
| | ३.१ | क्षेत्रिय पाहणी | ३ |
| | ३.२ | लाभधारकांचे लिंगभेदानुसार वर्गीकरण | ३ |
| | ३.३ | लाभार्थ्यांचा शैक्षणिकस्तर | ४ |
| | ३.४ | लाभार्थ्यांचे व्यवसायानुसार वर्गीकरण | ५ |
| | ३.५ | लाभार्थ्यांच्या उत्पन्नानुसार वर्गीकरण | ६ |
| | ३.६ | लाभार्थ्यांकडे असलेले पशुधन | ७ |
| | ३.७ | लाभार्थ्यांच्या घराची स्थिती | ८ |
| | ३.८ | लाभार्थ्यांचे जमातनिहाय वर्गीकरण | ९ |
| ४. | | गॅसकिट वाटप योजनेचे विश्लेषण | ११ |
| | ४.१ | लाभार्थ्यांचे इंधन वापरानुसार वर्गीकरण | ११ |
| | ४.२ | रोजच्या वापरासाठी लाकुडफाटा वापरण्याचे प्रमाण | १२ |
| | ४.३ | कार्डधारकानुसार वर्गीकरण | १३ |
| | ४.४ | गॅसकिट हाताळणी करणाऱ्यांचे वर्गीकरण | १४ |
| | ४.५ | घरात गॅस यूनिट आढळलेले लाभार्थी | १५ |
| | ४.६ | गॅसचा नियमित वापर करणारे लाभार्थी | १६ |
| | ४.७ | गॅस मिळण्याचे अंतर | १७ |
| | ४.८ | गॅस किटचा वापर करणारे लाभार्थी | १८ |
| ५. | | सारांश | २० |
| ६. | | निष्कर्ष | २१ |
| ७. | | योजना राबविण्यातील अडचणी व उपाययोजना | २२ |

**प्रकरण--१**

## गॅस किट वाटप योजनेच्या मूल्यमापनाचे उद्देश

राज्यातील आदिवासी क्षेत्र हे प्रामुख्याने डोंगराळ भागात आहे. अतिदुर्गम भागात आदिवासी रहात असल्याने त्यांचा जंगलाशी जवळचा संबंध आहे. आदिवासी जंगलामधून लाकूडफाटा व इतर साहित्याचा वापर आपल्या दैनंदिन जीवनात करत असतात आणि त्यामुळे जंगलतोड होत असते. अनुसूचित जमातीची जी कुटुंबे जंगलात व जंगलाच्या कडेला असतील व ज्यांचा स्वयंपाक जळाऊ लाकडावर असेल अशा कुटुंबाना गॅस यूनिट देऊन वृक्षतोड, लाकूडतोड थांबविणे, पर्यावरणाचे संतुलन राखणे, जमिनीची धूप थांबविणे, पर्जन्यवृष्टीमध्ये वाढ होण्यासाठी प्रयत्न करणे, त्यांच्या घरातील वातावरण धुरापासून मुक्त करणे व त्यांच्या आरोग्यात सुधारणा करणे इत्यादी बाबी विचारात घेऊन शासनाने क्रमांक बैठक-२००६/ प्र.क्र.१/ का.८, दिनांक २० ऑक्टोबर, २००६ अन्वये धोरणात्मक निर्णय घेतला व एका लाभार्थ्यास १४.२ कि.ग्रॅ. सिलेंडर, गॅस शेगडीसह जोडणी करून देऊन दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबांना, विधवा व परित्यक्ताना तसेच आदिम जमातीच्या कुटुंबांना प्राधान्याने लाभ देण्याची ही योजना राबविली आहे.

शासनाची सदर उद्दिष्टे पूर्ण झाली का याची पडताळणी करण्यासाठी गॅसकिट वाटप योजनेच्या मूल्यमापनाची पाहणी घेण्यात आली.

पाहणीमध्ये आढळलेल्या बाबींचे विश्लेषण ह्या अहवालात केले आहे.

## प्रकरण--२

# कार्यपद्धती

महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबांना घरगुती गॅस यूनिट पुरवठा योजना राबविण्यात आली. तिचे मूल्यमापन करण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमधील एक्षेविका कक्षाकडून ठाणे व रायगड जिल्ह्यातील गॅस युनिट मिळालेल्या १६० कुटुंबियांची पाहणी करण्यात आली.

सदर पाहणीचे काम ह्या कार्यालयातील खालील पथकाकडून पूर्ण करण्यात आले.

**तक्ता क्रमांक १**

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती ए. एस. काळे, | प्र. उपसंचालक |
| २. | श्री. उदय यादव, | आरेखक |
| ३. | श्री. रविंद्र पवार, | अन्वेषक |
| ४. | श्री. सोमनाथ कांबळे, | संशोधन सहाय्यक |
| ५. | श्रीमती सुप्रिया चव्हाण, | संशोधन सहाय्यक |

## प्रकरण -- ३

# पृथ:करण

## ३.१ क्षेत्रिय पाहणी

गॅस कीट पुरवठा योजनेचे मुल्यमापनासाठी नेमलेल्या पथकाने रायगड व ठाणे जिल्ह्यातील खाली दिल्याप्रमाणे ५ तालुक्यातील गावांची पाहणी केली.

**तक्ता क्र. -- २**

| अ.क्र. | रायगड | तालुका | गांवे संख्या | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|
| १. | रायगड | खालापूर | २ | १० |
| | | पेण | ५ | २८ |
| | | अलिबाग | ४ | ३४ |
| | | **एकूण** | **११** | **७२** |
| २. | ठाणे | डहाणू | ७ | ५५ |
| | | तलासरी | ३ | ३३ |
| | | **एकूण** | **१०** | **८८** |
| | २ जिल्हे | ५ तालुके | **२१** | **१६०** |

## ३.२ लाभधारकांचे लिंगभेदानुसार वर्गीकरण

पाहणी केलेल्या १६० लाभार्थींचे लिंगभेदानुसार वर्गीकरण माहिती खाली दिल्याप्रमाणे आढळले.

**तक्ता क्रमांक ३**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | गाव संख्या | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुरुष | स्त्री | एकूण |
| १. | रायगड | खालापूर | २ | ६ | ४ | १० |
| | | पेण | ५ | २५ | ३ | २८ |
| | | अलिबाग | ४ | २७ | ७ | ३४ |
| | | **एकूण** | **११** | **५८** | **१४** | **७२** |
| २. | ठाणे | डहाणू | ७ | ४८ | ७ | ५५ |
| | | तलासरी | ३ | ३२ | १ | ३३ |
| | | **एकूण** | **१०** | **८०** | **८** | **८८** |
| | **२ जिल्हे** | **५ तालुके** | **२१** | **१३८** | **२२** | **१६०** |

## ३.३ लाभार्थ्यांचा शैक्षणिकस्तर

पाहणी केलेल्या १६० लाभार्थ्यांच्या शिक्षणाचा विचार केला असता खालील परिस्थिती आढळली.

### तक्ता क्रमांक ४

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | पहिली ते चौथी | पाचवी ते सातवी | आठवी ते बारावी | पदवीधर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | रायगड | खालापूर | १० | १ | १ | -- | -- |
| | | पेण | २८ | २ | १ | -- | -- |
| | | अलिबाग | ३४ | ७ | ३ | -- | -- |
| | | **एकूण** | **७२** | **१०** | **५** | -- | -- |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | ७ | १५ | १५ | १ |
| | | तलासरी | ३३ | १ | २ | १० | -- |
| | | **एकूण** | **८८** | **८** | **१७** | **२५** | **१** |
| | **२ जिल्हे** | **५ तालुके** | **१६०** | **१८** | **२२** | **२५** | **१** |

वरील तक्त्यावरून असे आढळले की, पाहणी केलेल्या एकूण १६० लाभार्थ्यांपैकी ६६ म्हणजे ४१ % लाभार्थी शिकलेले असून ५९% लाभार्थी साक्षर नाहीत. जे ६६ लाभार्थी शिकलेले आहेत. त्यापैकी २७ % लाभार्थी ४ थी पर्यंत शिकलेले असून ३३ % लाभार्थी ७ वी पर्यंत शिक्षण घेतलेले आहेत. उरलेल्या लाभार्थ्यीपैकी ३९% लाभार्थी १२ वी पर्यंत शिकलेले असून केवळ १ % लाभधारक पदवीधारक आहेत.

जिल्हावार परिस्थिती पाहिली असता असे दिसते की, रायगड जिल्ह्यातील ७२ लाभार्थ्यीपैकी एकही लाभार्थी ७ वीच्या पुढे गेलेला नाही. रायगड जिल्ह्यात पाहणी केलेल्या एकूण ७२ लाभार्थ्यापैकी १४ % लाभार्थी प्राथमिकस्तरावर प्राथमिक म्हणजेच पहिली ते चौथी पर्यंतच शिकलेले आहेत. ७% लाभार्थी ७ वी पर्यंत शिकले आहेत. म्हणजेच ह्या जिल्ह्यात ७९% लाभार्थी अशिक्षित आहेत. खालापूर तालुक्यात ८०% लाभार्थी निरक्षर असून पेणमध्ये ९०% लाभार्थी निरक्षर आहेत व अलिबाग तालुक्यातील ७०% लाभार्थी निरक्षर आहेत.

ठाणे जिल्ह्यात पाहणी केलेल्या ८८ लाभार्थीपैकी ५८ % लाभार्थी सुशिक्षित असून ९% लाभार्थी चौथी पर्यंत शिकले आहेत. तर १९ % लाभार्थी सातवीपर्यंत, २८% लाभार्थी ८वी ते १२वी असून १ % लाभार्थी पदवीधर आहेत. उरलेले ४२ % लाभार्थी अशिक्षित आहेत. डहाणू तालुक्यात ६४ % लाभार्थी साक्षर असून ३६% निरक्षर आहेत. तलासरी तालुक्यात ३९% लाभार्थी शिक्षित असून उरलेले ६१ % लाभार्थी निरक्षर आहेत.

थोडक्यात रायगड व ठाणे या दोन्ही जिल्ह्यातील लाभार्थी मोठ्या प्रमाणात निरक्षर आहेत.

## ३.४ लाभार्थ्यांचे व्यवसायानुसार वर्गीकरण

पाहणी केलेल्या १६० लाभार्थ्यांच्या उदरनिर्वाहाच्या साधनाची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्रमांक ५**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | शेती | शेतमजुरी | मजुरी | नोकरी | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
| १. | रायगड | खालापूर | १० | १ | १ | ६ | २ | -- |
| | | पेण | २८ | ७ | ६ | १३ | १ | १ |
| | | अलिबाग | ३४ | ७ | १० | १४ | २ | १ |
| | रायगड | **एकूण** | **७२** | **१५** | **१७** | **३३** | **५** | **२** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | ४९ | ० | ३ | १ | २ |
| | | तलासरी | ३३ | २९ | १ | -- | ३ | -- |
| | ठाणे | **एकूण** | **८८** | **७८** | **१** | **३** | **४** | **२** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **९३** | **१८** | **३६** | **९** | **४** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, पाहणी केलेल्या १६० लाभार्थ्यांपैकी फक्त ८ % लाभार्थी नोकरी व इतर व्यवसायात आहेत. तर ५८% लाभार्थी शेती व्यवसायात गुंतले असून ११% लाभार्थी शेतमजुरी करणारे आहेत. मोठ्या प्रमाणात म्हणजेच २२ % लाभार्थी मजुरी करणारे आहेत. म्हणजेच ३३% लाभार्थी हातावर पोट असलेले आहेत.

रायगड जिल्ह्यात पाहणी केलेल्या ७२ लाभार्थ्यांपैकी २०% लाभार्थी शेती करतात. २४% शेतमजुरी व ४६% मजूरी करतात. नोकरी करणारे फक्त ७% असून स्वतःचा व्यवसाय करणारे लाभार्थी ३% आहेत.

ठाणे जिल्ह्यात पाहणी केलेल्या ८८ लाभार्थ्यींपैकी ८९% लाभार्थी शेती करणारे आहेत. १% लाभार्थी शेतमजुरी करणारे व ३% लाभार्थी मजूरी करणारे आहेत. ५% लाभार्थी नोकरी करतात तर २% लाभार्थी व्यवसायात गुंतले आहेत. या जिल्ह्यात शेती करणारांचे प्रमाण बरेच जास्त असून रोजंदारी करणारांचे प्रमाण नगण्य आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात १०% लाभार्थी शेतकरी असून पेण तालुक्यात २५% लाभार्थी शेती करणारे आहेत. तर अलिबाग तालुक्यात हे प्रमाण २१ % आहे. खालापूरमध्ये ७०%, पेण तालुक्यात ६८% तर अलिबाग तालुक्यात ७१ % लाभार्थी मोलमजुरी करुन उपजिविका चालवतात.

ठाणे जिल्ह्यात डहाणू व तलासरी तालुक्यात ८८% ते ८९ % लाभार्थी शेती करतात. म्हणजेच मोलमजुरीचे प्रमाण कमी आहे.

## ३.५ लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण


ठाणे व रायगड जिल्ह्यातील १६० लाभार्थ्यांच्या उत्पन्नाकडे दृष्टिक्षेप टाकला असता असे आढळते की, ५२% लाभार्थींचे उत्पन्न रुपये **२०,०००/-** पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी आहे. ३४% लाभार्थ्यांचे उत्पन्न रुपये २०,०००/- ते ४०,०००/- ह्या मर्यादेत आहे. ७% लाभार्थ्यांचे उत्पन्न रुपये ४० ते ६० हजाराच्या दरम्यान आहे. तर फक्त ६% लाभार्थ्यांचे उत्पन्न रुपये ६० हजार वा ह्यापेक्षा अधिक आहे. खाली दिलेल्या तक्त्यावरुन ही बाब अधिक स्पष्ट होईल.

**तक्ता क्रमांक ६**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | ० ते २० हजार | २० ते ४० हजार | ४० ते ६० हजार | ६० हजारापेक्षा जास्त |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | रायगड | खालापूर | १० | ८ | -- | -- | २ |
| | | पेण | २८ | १४ | १२ | २ | -- |
| | | अलिबाग | ३४ | २१ | ११ | २ | -- |
| | | **एकूण** | **७२** | **४३** | **२३** | **४** | **२** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | २३ | २३ | ५ | ४ |
| | | तलासरी | ३३ | १८ | ९ | २ | ४ |
| | | **एकूण** | **८८** | **४१** | **३२** | **७** | **८** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **८४** | **५५** | **११** | **१०** |

खालापूर तालुक्यात पाहणी केलेल्या लाभार्थ्यांपैकी ८०% लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न फक्त रुपये २० हजारापर्यंत आहे. पेणमध्ये हे प्रमाण ५०% असून अलिबागमध्ये ६०% आहे.

खालापूर तालुक्यातील अन्य २ लाभार्थ्यांचे उत्पन्न रुपये ६० हजारापेक्षा जास्त आहे.



रुपये २० हजार ते ४० हजाराच्या वार्षिक उत्पन्न गटात पेण तालुक्यातील ४३ % लाभार्थी येतात. तर अलिबाग तालुक्यात हे प्रमाण ३३ % आहे.

वार्षिक उत्पन्न रुपये ४० ते ६० हजार असलेल्या गटात पेण व अलिबाग तालुक्यात प्रत्येकी २ लाभार्थी आहेत.

ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात ४२% व तलासरी तालुक्यात ५५% लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये २० हजारापर्यंत वा त्यापेक्षा कमी आहे.

रुपये २० ते ४० हजार या उत्पन्नाच्या गटात डहाणू तालुक्यातील ४२ % लाभार्थी येत असून तलासरी तालुक्यामधील २८% लाभार्थी येतात.

डहाणू तालुक्यातील ९% लाभार्थ्यांचे उत्पन्न रुपये ४० ते ६० हजार असून तलासरी तालुक्यामधील ६% लाभार्थी या उत्पन्न गटात येतात. रुपये ६० हजारापेक्षा जास्त उत्पन्न डहाणू तालुक्यात ७% लाभार्थ्यांचे तलासरी तालुक्यात १२% लाभार्थींचे आहे.

थोडक्यात निम्म्या लाभार्थ्यींचे उत्पन्न रुपये २० हजारापेक्षा कमी असून केवळ ६% लाभार्थ्यींचे उत्पन्न रुपये ६० हजारापेक्षा जास्त आहे.

## ३.६ लाभार्थ्यींकडे असलेले पशुधन

रायगड व ठाणे जिल्ह्यातील १६० लाभार्थीकडे ६४ गायी, २ म्हशी, १२२ बैल व १७० शेळ्या आहेत. मात्र यातले बरेचसे पशुधन ठाणे जिल्ह्यात असून रायगड जिल्ह्यात अत्यल्प पशुधन आहे. लाभार्थीकडील पशुधनाची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्रमांक ७**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | गाय | म्हैस | बैल | शेळ्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | रायगड | खालापूर | १० | ० | ० | ० | ० |
| | | पेण | २८ | २ | ० | १ | ६१ |
| | | अलिबाग | ३४ | २ | ० | १३ | ४५ |
| | | **एकूण** | **७२** | **४** | **०** | **१४** | **१०६** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | ४१ | १ | ६२ | ४५ |
| | | तलासरी | ३३ | १९ | १ | ४६ | १९ |
| | | **एकूण** | **८८** | **६०** | **२** | **१०८** | **६४** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **६४** | **२** | **१२२** | **१७०** |

पाहणी केलेल्या लाभार्थ्यांकडील एकूण गाईच्या फक्त ६% गायी रायगड जिल्ह्यात आहेत. तर ९४ % गायी ठाणे जिल्ह्यात आहेत असे आढळले. दोन्ही जिल्ह्यात मिळून २ च म्हशी आहेत. दोन्ही जिल्ह्यातील एकूण १२२ बैलापैकी फक्त ११% बैल रायगड जिल्ह्यात असून ८९% बैल ठाणे जिल्ह्यात आहेत. शेळ्यांच्या बाबतीत मात्र रायगड जिल्ह्यात ६२% शेळ्या असून त्यापेक्षा कमी म्हणजे ४८% शेळ्या ठाणे जिल्ह्यात असल्याचे आढळले.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील १० लाभार्थ्यांकडे काहीच पशुधन नसल्याचे दिसले.

पेण तालुक्यात २८ लाभार्थ्यांकडे मिळून २ गाई व १ बैल व ६१ शेळ्या आहेत.

अलिबाग तालुक्यात ३४ लाभार्थ्यांकडे २ गाई १३ बैल व ४५ शेळ्या आहेत. पेणपेक्षा अलिबागची स्थिती बरी आहे. कारण पेणमध्ये शेळ्या जास्त असल्या तरी अलिबागमध्ये बैल जास्त आहेत.

ठाणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांकडे असलेल्या एकूण गायींपैकी ६८% गायी डहाणू तालुक्यात असून तलासरी तालुक्यात ३२% गाई आहेत. एकूण बैलापैकी ५७% बैल डहाणू तालुक्यात असून ४३% तलासरी तालुक्यात आहेत. थोडक्यात डहाणू तालुक्यात दर लाभार्थ्यांमागे असलेल्या पशुधनाची संख्या जास्त आहे.

## ३.७ लाभार्थ्यांच्या घराची स्थिती

गॅस किट वाटप योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या घराच्या स्थितीबाबत माहिती खालील तक्यात दिली आहे.

**तक्ता क्रमांक ८**

**घराची स्थिती**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | कच्चे | अर्ध कच्चे | पक्के | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | स्वतःचे | शासनाचे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | रायगड | खालापूर | १० | १ | ३ | ५ | १ |
| | | पेण | २८ | ४ | २ | १० | १२ |
| | | अलिबाग | ३४ | ३ | १ | १० | २० |
| | | **एकूण** | **७२** | **८** | **६** | **२५** | **३३** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | २० | १८ | १३ | ४ |
| | | तलासरी | ३३ | १९ | ७ | १ | ६ |
| | | **एकूण** | **८८** | **३९** | **२५** | **१४** | **१०** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **४७** | **३१** | **३९** | **४३** |

रायगड व ठाणे जिल्ह्यात पाहणी केलेल्या लाभार्थींच्या घराची स्थिती पाहिली असता निम्मी घरे कच्च्या स्वरुपाची असल्याचे आढळते. पक्क्या स्वरुपाची स्वतःची घरे असलेल्याचे प्रमाण २४% आहे व २६% पक्की घरे शासनाने बांधून दिली आहेत.

कच्च्या घरांमध्ये देखील ६०% घरे पूर्ण कच्ची असून ४०% घरे अर्ध कच्ची आहेत. रायगड जिल्ह्यातील कच्च्या घराचे प्रमाण ठाणे जिल्ह्यातील कच्च्या घरांपेक्षा कमी आहे. एकूण कच्च्या घरांपैकी ८१% कच्ची घरे ठाणे जिल्ह्यात असून १९% घरे रायगड जिल्ह्यात आहेत.

तर एकूण स्वतःच्या पक्क्या घरांपैकी ३५% पक्की घरे ठाणे जिल्ह्यात व ६५% रायगड जिल्ह्यात आहेत.

शासनाच्या पक्क्या घरांपैकी ३३% पक्की घरे ठाणे जिल्ह्यात असून ७७ % शासनाची पक्की घरे रायगड जिल्ह्यात आहेत.

रायगड जिल्ह्यातील एकूण ७२ लाभार्थ्यांपैकी ८१% लाभार्थ्यांची घरे पक्की असून १९% लाभार्थ्यांची घरे कच्च्या स्वरुपाची आहेत. तर ठाणे जिल्ह्यात पक्क्या स्वरुपाची घरे असलेले २७% लाभार्थी आहेत व ७३% लाभार्थ्यांची घरे कच्ची आहेत.

रायगड जिल्ह्यातील ४६% लाभार्थ्यांना शासनाने पक्की घरे दिली असून ठाणे जिल्ह्यात हे प्रमाण ११% आहे.

घरांच्या स्थितीचे तालुकावार विश्लेषण केले असता रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील ४०% लाभार्थ्यांची घरे कच्ची आहेत. पेण तालुक्यामध्ये हे प्रमाण २१% असून अलिबाग तालुक्यात ते १२% आहे.

रायगड जिल्ह्यातील एकूण पक्क्या घरांपैकी ४३% पक्की घरे लाभार्थ्यांनी स्वतः बांधली आहेत. तर ५७% पक्की घरे शासनाने दिली आहेत.

ठाणे जिल्ह्यातील एकूण कच्च्या घरांपैकी ४१% कच्ची घरे तलासरी तालुक्यात असून ५९% कच्ची घरे डहाणू तालुक्यात आहेत. ठाणे जिल्ह्यातील स्वतःच्या एकूण पक्क्या घरांपैकी ७% घरे तलासरी तालुक्यात असून ९३% स्वतःची पक्की घरे डहाणू तालुक्यात आहे.

शासनाने दिलेल्या पक्क्या घरांचे प्रमाण डहाणू तालुक्यात ४०% तर तलासरी तालुक्यात ६०% आहे.

लाभार्थ्यांचे व पक्क्या घरांचे परस्परांशी असलेले प्रमाण पाहिले तर ठाणे व रायगड जिल्ह्यातील एकूण लाभार्थ्यांपैकी ५८% लाभार्थ्यांची घरे पक्क्या स्वरुपाची आहेत. व ४२% कच्च्या स्वरुपाची आहेत.

---------------------------

## ३.८ लाभार्थ्यांचे जमात निहाय वर्गीकरण

पाहणी केलेल्या लाभार्थ्यांचे जमातनिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे होते.

**तक्ता क्रमांक ९**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | कातकरी | ठाकूर | म.कोळी | वारली | कोकणा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. |
| १. | रायगड | खालापूर | १० | १० | -- | -- | -- | -- |
| | | पेण | २८ | २४ | ४ | -- | -- | -- |
| | | अलिबाग | ३४ | १० | २४ | -- | -- | -- |
| | | **एकूण** | **७२** | **४४** | **२८** | **--** | **--** | **--** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | ५५ | -- | -- | ९ | ३७ |
| | | तलासरी | ३३ | -- | -- | ३३ | -- | -- |
| | | **एकूण** | **८८** | **--** | **--** | **४२** | **३७** | **९** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **४४** | **२८** | **४२** | **३७** | **९** |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्वात जास्त २८% लाभार्थी कातकरी समाजाचे असून २६% लाभार्थी महादेव कोळी समाजाचे आहेत. वारली समाजाच्या लाभार्थ्यांचे प्रमाण २३% असून ठाकूर १७% आहेत. सर्वात कमी कोकणा जमातीचे लाभार्थी असून त्यांचे प्रमाण फक्त ६% आहे.

रायगड जिल्ह्यात कातकरी व ठाकूर समाजाचे लाभार्थी असून खालापूर व पेण तालुक्यात कातकरींचे मोठे प्रमाण असून अलिबाग तालुक्यात ठाकूर समाजाचे लाभार्थी जास्त आढळले.

ठाणे जिल्ह्यातील लाभार्थी वारली, महादेव कोळी व कोकणा ह्या जमातीचे असून डहाणू तालुक्यातील एकूण लाभार्थ्यांपैकी ६८% लाभार्थी वारली समाजाचे आहेत व महादेव कोळी व कोकणा जमातीचे प्रत्येकी १६% लाभार्थी आहेत. तलासरी तालुक्यात सर्व लाभार्थी वारली ह्या जमातीचे आढळले.

थोडक्यात कातकरी, ठाकूर, वारली, म. कोळी व कोकणा ह्या वेगवेगळ्या ५ जमातीच्या लाभार्थींची पाहणी करण्यात आली व त्यात कातकरी, महादेव कोळी ह्या जमातीचे लाभार्थी जास्त होते.

---------------------------

## प्रकरण--४

# गॅस किट वाटप योजनेचे विश्लेषण


## ४.१ लाभार्थ्यांचे इंधन वापरानुसार वर्गीकरण

रायगड व ठाणे जिल्ह्यातील गॅस किट वाटप केलेल्या १६० लाभार्थ्यांचे इंधन वापरानुसार वर्गीकरण केले तर खालील परिस्थिती आढळते.

**तक्ता क्रमांक १०**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | लाकूड | कोळसा | रॉकेल | लाकूड व रॉकेल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. |
| १. | रायगड | खालापूर | १० | ४ | -- | -- | ६ |
| | | पेण | २८ | २० | -- | -- | ८ |
| | | अलिबाग | ३४ | २३ | -- | -- | ११ |
| | | **एकूण** | **७२** | **४७** | -- | -- | **२५** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | ५० | -- | -- | ५ |
| | | तलासरी | ३३ | २७ | -- | -- | ६ |
| | | **एकूण** | **८८** | **७७** | -- | -- | **११** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **१२४** | -- | -- | **३६** |

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट होते की, ८०% लाभार्थी गॅस किट वाटप केल्यानंतरही इंधन म्हणून लाकूडफाटा वापरत आहेत व फक्त २०% लाभार्थी लाकूड व रॉकेलचा इंधन म्हणून उपयोग करत आहेत.




रायगड जिल्ह्यात लाकूड व रॉकेल वापरणारांचे प्रमाण ठाणे जिल्ह्यापेक्षा जास्त आहे. रायगड जिल्ह्यात हे प्रमाण ३३% आहे तर ठाणे जिल्ह्यात हे प्रमाण ७% आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात ६० % लाभार्थी लाकडाबरोबर रॉकेलही वापरतात.

पेण तालुक्यात हे प्रमाण २९% आहे. तर अलिबाग तालुक्यात ३२% आहे.

ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात लाकडाबरोबर रॉकेल वापरणारे लाभार्थी ९% आहे. तर तलासरी तालुक्यात ते १८% आहेत.

## ४.२ रोजच्या वापरासाठी लाकूडफाटा वापरण्याचे प्रमाण

रोजच्या वापरासाठी लागणारा लाकूडफाटा काही जण जंगलातून आणतात. काही स्वतःच्या शेतातून पैदा करतात. तर काही विकत घेतात. याबाबतची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्रमांक ११**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | जंगलातून आणणारे | विकत घेणारे | स्वतःच्या शेतातून आणणारे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | रायगड | खालापूर | १० | १० | -- | -- |
| | | पेण | २८ | २८ | -- | -- |
| | | अलिबाग | ३४ | ३४ | -- | -- |
| | | **एकूण** | **७२** | **७२** | **--** | **--** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | ५५ | -- | -- |
| | | तलासरी | ३३ | १९ | ७ | ७ |
| | | **एकूण** | **८८** | **७४** | **७** | **७** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **१४६** | **७** | **७** |

यावरुन असे स्पष्ट होते की, ९१% लाभार्थी जंगलातून आणून लाकूडफाटा वापरतात. केवळ ठाणे जिल्ह्यातील तलासरी तालुक्यातील ७ लाभार्थी लाकूडफाटा विकत घेतात व ७ लाभार्थी स्वतःच्या शेतीतून तो पैदा करतात. म्हणजेच तलासरीमध्ये ५८% लाकूडफाटा जंगलातून आणतात व ४२ % लाकूडफाटा विकत घेतात व स्वतःच्या शेतीतून आणतात.

## ४.३ कार्डधारकानुसार वर्गीकरण

### तक्ता क्रमांक १२

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | कार्ड असलेले | कार्ड नसलेले |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | रायगड | खालापूर | १० | १० | -- |
| | | पेण | २८ | १७ | ११ |
| | | अलिबाग | ३४ | ३० | ४ |
| | | **एकूण** | **७२** | **५७** | **१५** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | ५२ | ३ |
| | | तलासरी | ३३ | २९ | ४ |
| | | **एकूण** | **८८** | **८१** | **७** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **१३८** | **२२** |

गॅस किट वाटप योजनेमधून गॅस मिळालेल्या लाभधारकांजवळ गॅस कंपनीने कार्ड दिले की, नाही याची पडताळणी केल्यानंतर दिसलेली स्थिती वरील तक्त्यात विषद केली आहे.

गॅस किट वाटप योजनेच्या १६० लाभार्थ्यांपैकी ८६% लाभधारकांना कार्ड मिळाले होते व १४% लाभार्थ्यांना कार्ड उपलब्ध झाले नव्हते.

रायगड जिल्ह्यात ७९% लाभधारकांना कार्ड मिळाले असून ठाणे जिल्ह्यात हे प्रमाण ९२% आहे. रायगड जिल्ह्यापेक्षा कार्ड धारकांचे प्रमाण ठाणे जिल्ह्यात जास्त आहे.

रायगड जिल्ह्यातदेखील खालापूर तालुक्यातील सर्वच्या सर्व लाभार्थ्यांना कार्ड मिळाले असून पेण तालुक्यात हे प्रमाण ६९% व अलिबाग तालुक्यात हे प्रमाण ८८% आहे. ठाणे जिल्ह्यात डहाणू तालुक्यात ९४% लाभार्थ्यांना कार्ड मिळाले आहे व तलासरी तालुक्यात ८८% लाभधारकांना कार्ड प्राप्त झाले आहे.

## ४.४ गॅस यूनिट हाताळणारे लाभार्थी

शासनाकडून गॅस किट वाटप योजना राबविण्यात आली असली तरी गॅस किट वापरण्याचे प्रशिक्षण मिळाले नाही व अनेकांना गॅस हाताळण्याची भिती वाटते ही वस्तुस्थिती आहे.

गॅस किट हातळण्याच्या संदर्भातील आकडेवारी खालील तक्त्यात दिली आहे.

**तक्ता क्रमांक १३**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | गॅस हाताळणारे | गॅस न हाताळणारे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | रायगड | खालापूर | १० | ७ | ३ |
| | | पेण | २८ | ७ | २१ |
| | | अलिबाग | ३४ | २० | १४ |
| | | **एकूण** | **७२** | **३४** | **३८** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | १० | ४५ |
| | | तलासरी | ३३ | २ | ३१ |
| | | **एकूण** | **८८** | **१२** | **७६** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **४६** | **११४** |

वरील आकडेवारी तपासली असता असे निदर्शनास येते की, ७१% लाभार्थी गॅस हाताळत नाहीत व फक्त २९% लाभार्थी गॅस किट हाताळू शकतात.

रायगड जिल्ह्यामध्ये ५३% लाभार्थी गॅस हाताळत नाहीत तर ठाणे जिल्ह्यात ८६% लाभार्थी गॅस हाताळू शकत नाही. थोडक्यात ठाणे जिल्ह्यापेक्षा साडेतीनपट जास्त लाभार्थी रायगड जिल्ह्यात गॅस हाताळू शकतात.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात गॅस न हाताळणाऱ्यांचे प्रमाण ३०% आहे. पेण तालुक्यात हे प्रमाण ७५% इतके जास्त आहे. तर अलिबाग तालुक्यात ४१% आहे.

ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात गॅस न हाताळणाऱ्याचे प्रमाण ८२% आहे तर अलिबाग तालुक्यात ते ९४% आहे.

यावरुन असे दिसते की, गॅस न हाताळण्यास अज्ञान व भय ह्या दोन्ही बाबी कारणीभूत ठरतात. आदिवासी समाज मुख्य प्रवाहापासून दूर आहे ह्याचे स्पष्ट चित्र येथे दिसते.

## ४.५ घरात गॅस यूनिट आढळलेले लाभार्थी

गॅस किट वाटप योजनेत गॅस यूनिट दिलेल्या १६० लाभार्थ्यांचे घरात तपासणीचे वेळी गॅस किट उपलब्ध होते की नाही हे पडताळले असता खालील परिस्थिती आढळली .

**तक्ता क्रमांक १४**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | घरात गॅस किट असलेले | घरात गॅस किट नसलेले |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | रायगड | खालापूर | १० | ९ | १ |
| | | पेण | २८ | १२ | १६ |
| | | अलिबाग | ३४ | १८ | १६ |
| | | **एकूण** | **७२** | **३९** | **३३** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | ५३ | २ |
| | | तलासरी | ३३ | ३३ | -- |
| | | **एकूण** | **८८** | **८६** | **२** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **१२५** | **३५** |

गॅस किट दिलेले १६० लाभार्थीपैकी ७८% लाभार्थ्यांकडे घरात गॅस किट उपलब्ध होते व २२% लाभार्थ्यांच्या घरात गॅस किट नसल्याचे आढळते. गॅस किट घरात उपलब्ध असणाऱ्यात ठाणे जिल्ह्याचा नंबर रायगड जिल्ह्याच्या वर लागतो. रायगड जिल्ह्यात गॅस किट घरात उपलब्ध असण्याचे प्रमाण ५४% आहे व यूनिट नसलेल्यांचे प्रमाण ४६% आहे. म्हणजेच रायगड जिल्ह्यातील जवळ जवळ निम्म्या लाभधारकांकडे गॅस किट नव्हते. ठाणे जिल्ह्यात मात्र ९८% लाभधारकांकडे घरात गॅस किट उपलब्ध होते.

रायगड ज़िल्ह्यातील खालापूर तालुक्यात ९०% लाभार्थींच्या घरात गॅस सिलेंडर होते. मात्र पेण तालुक्यात ५७% लाभार्थींच्या घरात सिलेंडर सापडले नाही. कमी-अधिक फरकाने हिच परिस्थिती अलिबाग तालुक्यातही आढळली. अलिबाग तालुक्यात ४७% लाभार्थ्यांच्या घरात गॅस किट नसल्याचे आढळले.

ठाणे जिल्ह्यात मात्र अशी परिस्थिती आढळली नाही. फक्त ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील ५५ लाभार्थ्यांपैकी २ लाभार्थ्यांकडे गॅस किट नसल्याचे आढळले. तलासरी तालुक्यात सर्वच्या सर्व ३३ लाभार्थ्यांच्या घरात गॅस किट होते.

## ४.६ गॅसचा नियमित वापर

शासनाकडून दिलेले गॅस किट जरी घरात आढळले तरी त्याचा नियमितपणे वापर होतो का याची विचारणा केली असता आढळलेली परिस्थिती खालीलप्रमाणे होती.

**तक्ता क्रमांक १५**

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | गॅस नियमित वापरणारे | गॅस नियमित न वापरणारे |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | रायगड | खालापूर | १० | २ | ८ |
| | | पेण | २८ | ४ | २४ |
| | | अलिबाग | ३४ | ५ | २९ |
| | | **एकूण** | **७२** | **११** | **६१** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | २९ | २६ |
| | | तलासरी | ३३ | ११ | २२ |
| | | **एकूण** | **८८** | **४०** | **४८** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **५१** | **१०९** |

गॅस किट वाटप केलेल्या रायगड व ठाणे जिल्ह्यांच्या १६० लाभार्थीपैकी केवळ ३२% लाभधारक गॅस वापरतात ६८% लाभधारकाकडून गॅसचा वापर होत नाही.

रायगड जिल्ह्यात नियमितपणे गॅस वापर फक्त १५% असून ठाणे जिल्ह्यातील गॅस वापरणारांचे प्रमाण ४५% आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात २०% लाभार्थी गॅसचा वापर करतात. पेण तालुक्यात १४% लाभार्थी गॅस वापरतात. तर अलिबाग तालुक्यातील गॅस वापर करणारांचे प्रमाण १५% आहे.

ठाणे जिल्ह्यात डहाणू तालुक्यातील ५३% लाभार्थी गॅसचा वापर करत असले तरी तलासरी तालुक्यात हे प्रमाण फक्त ३३% आहे.

## ४.७ गॅस मिळण्याचे अंतर


आदिवासी कुटुंबांना शासनाने गॅस किट वाटप केले असले तरी गॅसचे सिलेंडर पुन्हा नव्याने भरून घेणेसाठी आदिवासीच्या वस्तीपासून जवळ उपलब्ध होणे जरुरीचे आहे. परंतु वास्तविक परिस्थिती तशी नाही. लाभधारकांना गॅस सिलेंडर ५ कि.मी. पेक्षा अधिक अंतरावरून वाहून आणावे लागते. पाहणी केलेल्या १६० लाभार्थ्यांपैकी गॅस सिलेंडर किती लाभार्थ्यांना घराजवळ म्हणजे ५ कि.मी.चे आत उपलब्ध होते ते खालील तक्त्यात दर्शविले आहे.

**गॅस मिळण्याचे अंतर**

**तक्ता क्रमांक १६**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | ५ कि.मी. आत | ५ कि.मी. पेक्षा दूर |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | रायगड | खालापूर | १० | ३ | ७ |
| | | पेण | २८ | ४ | २४ |
| | | अलिबाग | ३४ | ६ | २८ |
| | | **एकूण** | **७२** | **१३** | **५९** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | ४ | ५१ |
| | | तलासरी | ३३ | ९ | २४ |
| | | **एकूण** | **८८** | **१३** | **७५** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **२६** | **१३४** |

वरील तक्त्यावरून असे दिसते की, पाहणी केलेल्या लाभार्थ्यांपैकी फक्त १६% लाभार्थ्यांना गॅस सिलेंडर घराजवळ म्हणजे ५ कि.मी. च्या आत उपलब्ध होते. उर्वरित ८४% लाभधारकांना गॅस उपलब्ध होण्याचे ठिकाण ८ कि.मी. पेक्षा जास्त दूर आहे.




रायगड जिल्ह्यातील खालापूर, पेण व अलिबाग ह्या तिन्ही तालुक्यात गॅस घराजवळ उपलब्ध होण्याचे प्रमाण १४ ते १६% आहे. तर ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यात ते केवळ ७% असून तलासरी तालुक्यात सर्वात जास्त म्हणजे २७% आहे.

## ४.८ गॅस किटचा वापर

शासनाकडुन मिळालेले गॅस यूनिट न वापरण्याची अनेक कारणे आहेत. यापैकी अनेक लाभार्थ्यांना गॅसचे नवीन सिलेंडर दर वेळी विकत घेणे त्यांना परवडत नसल्याचे समजले. आर्थिकदृष्ट्या तळाच्यास्तरावर असलेल्या ह्या कुटुंबांना रोजची रोजीरोटी मिळणे कठीण असताना दरमहा एवढा आर्थिक भार सोसणे त्यांच्या कुवतीबाहेरचे असल्याचे स्पष्ट होते.

**तक्ता क्रमांक १७**

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | मिळाला नाही | नियमित वापर | परवडत नाही | हाताळणे जमत नाही | दुसऱ्याला दिला | भाड्याने दिला | विक्री |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१.** | **२.** | **३.** | **४.** | **५.** | **६.** | **७.** | **८.** | **९.** | **१०.** | **११.** |
| १. | रायगड | खालापूर | १० | -- | २ | ५ | १ | २ | -- | -- |
| | | पेण | २८ | २ | ४ | १७ | -- | ४ | -- | १ |
| | | अलिबाग | ३४ | -- | ५ | २१ | १ | ५ | १ | १ |
| | | **एकूण** | **७२** | **२** | **११** | **४३** | **२** | **११** | **१** | **२** |
| २. | ठाणे | डहाणू | ५५ | १ | २९ | २४ | -- | १ | -- | १ |
| | | तलासरी | ३३ | -- | ११ | २२ | -- | -- | -- | -- |
| | | **एकूण** | **८८** | **१** | **४०** | **४६** | **--** | **१** | **--** | **--** |
| | **एकूण एकंदर** | | **१६०** | **३** | **५१** | **८९** | **२** | **१२** | **१** | **२** |

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, पाहणी केलेल्या १६० लाभार्थ्यांपैकी ५६ % लाभार्थींना गॅस वापरणे परवडत नाही त्यामुळे ते गॅस वापरत नाहीत.

रायगड जिल्ह्यात ६०% लाभार्थ्यांना गॅस परवडत नसून ठाणे जिल्ह्यात हे प्रमाणे ५३% आहे.

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात गॅस न परवडणारांचे प्रमाण ५०% असून पेण तालुक्यात ६०% कुटुंबे गॅस परवडत नसल्याचे सांगतात. अलिबाग तालुक्यात हे प्रमाण ६२% आहे.

ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील एकूण ५५ लाभार्थ्यांपैकी ४५% लाभार्थ्यांना गॅस परवडत नसून तलासरी तालुक्यात गॅस वापर न परवडणारी ६७% कुटुंबे आहेत.

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की, ५ तालुक्यातील वेगवेगळ्या ५ जमातीच्या लाभार्थींची पाहणी केली असता किमान ५०% लाभार्थ्यांना गॅस सिलेंडर पुन्हा भरून घेणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही.

रायगड व ठाणे दोन्ही जिल्ह्यात मिळून ३ लाभार्थ्यांना सिलेंडर किंवा शेगडी मिळालीच नसल्याचे समजले. तर अनेकांनी तो हाताळता येत नसल्याचेही सांगितले. केवळ गॅस हाताळता येत नाही म्हणून गॅस न वापरणारे २ लाभार्थी आढळले.

गॅस वापरण्यास देण्याचे, विकण्याचे, भाड्याने देण्याचे व्यवहारही लाभार्थ्यांनी केल्याचे आढळले.

एकूण १६० लाभार्थ्यांपैकी १५ लाभार्थ्यांनी दुसऱ्यांना गॅस दिल्याचे समजले हे प्रमाण ९ % आहे. रायगड व ठाणे जिल्ह्याची स्थिती पाहिली तर ठाणे जिल्ह्यातील फक्त एका लाभार्थ्याने गॅस दुसऱ्यास दिल्याचे आढळले असून उर्वरित सर्व १४ लाभार्थी रायगड जिल्ह्यातील आहेत.

खालापूर तालुक्यातील २०% लाभार्थ्यांनी गॅस दुसऱ्यांना वापरण्यास दिला आहे. पेण तालुक्यातील १८% लाभार्थ्यांनी गॅस दुसऱ्याला दिला आहे. अलिबाग तालुक्यातही हे प्रमाण २१% आहे.

रायगड जिल्ह्यातील ज्या १४ लाभार्थ्यांनी दुसऱ्यांना गॅस दिला आहे. त्यापैकी एकाने गॅस विकल्याचे सांगितले असून इतरांनी तो भाड्याने दिला आहे.

---

## प्रकरण--५

# सारांश

दारिद्र्य रेषेखालील आदिवासी लाभार्थ्यांना गॅस किट पुरवण्याची जी योजना राबविण्यात आली यापैकी १६० लाभार्थ्यांन भेटी देण्यात आल्या.

गॅस किट वाटप होऊनही फक्त ३२% कुटुंबे नियमीतपणे गॅस वापरत आहेत. उरलेल्या ६८% कुटुंबांनी गॅसचा उपयोग करून घेतलेला नाही असे आढळते.

दारिद्र्य रेषेखाली असलेल्या ह्या कुटुंबाना गॅस सिलेंडर पुन्हा पुन्हा भरून घेणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. फुकट सरपण मिळत असताना हा खर्च त्यांना अनाठायी वाटतो. यातील काही कुटुंबे स्वतः लाकूडफाटा विकण्याचा व्यवसाय करतात.

काही लाभार्थ्यांनी मिळालेले गॅस किट दुसऱ्यांना भाड्याने देऊन दरमहा रुपये २५०-३०० उत्पन्न मिळविणे सुरू केले आहे. थोडक्यात गॅस किट हे त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन बनले आहे.

रायगड जिल्ह्यात गॅसचा नियमित वापर फक्त १५% कुटुंबे करत असून ८५% कुटुंबे गॅस वापरत नाहीत.

तसेच गॅस किट योजनेच्या लाभार्थ्यांना गॅस दूरून आणावा लागतो. सिलेंडर घराजवळ उपलब्ध होऊ शकत नाही.

गॅस किट वाटप केलेल्या लाभार्थ्यांकडे पशुधनही फारसे नाही.

गॅस किट यूनिटचा वापर व लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न ह्यांचा जवळचा संबंध आहे. एकूण १६० लाभार्थ्यांपैकी १३९ लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न ० ते ४० हजाराच्या दरम्यान आहे.

रायगड जिल्ह्यातील रुपये ० ते ४० हजार वार्षिक उत्पन्न असणाराची संख्या ६६ असून गॅस न परवडणारांची संख्या ४३ आहे. शिवाय १४ कुटुंबांनी गॅस दुसऱ्यास दिला आहे. ह्याचाच अर्थ ५७ कुटुंबे गॅस वापरू शकत नाहीत. केवळ ६ लाभार्थ्यांचे उत्पन्न रुपये ४० हजारापेक्षा जास्त आहे व नियमित गॅस वापरणारे ११ लाभार्थी आहेत.

ठाणे जिल्ह्यात ७३ कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न रुपये ० ते ४० हजार पर्यंत असून पैकी ४६ कुटुंबांना गॅस परवडत नाही.

रायगड जिल्ह्यात खालापूर तालुक्यात रु. ० ते २० हजार वार्षिक उत्पन्न असलेले ८ लाभार्थी असून गॅस न वापरणारेसुध्दा लाभार्थी ८ च आहेत. पेण तालुक्यात २६ लाभार्थ्यांचे उत्पन्न रु. ० ते ४० हजाराचे दरम्यान असून गॅस न वापरणारे २२ लाभार्थी आहेत. अलिबाग तालुक्यात देखील ३२ लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ० ते ४० हजार रुपये दरम्यान असून गॅसचा वापर २९ लाभार्थी करू शकत नाहीत.

ठाणे जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील ४६ लाभार्थ्यांचे वार्षिक उत्पन्न रु. ० ते ४० हजार ह्या गटातील असूनही केवळ २६ लाभार्थी गॅस वापरत नाहीत. ह्या तालुक्यात गॅसचा वापर इतर तालुक्याच्या मानाने जास्त आहे.

तलासरी तालुक्यात मात्र २७ लाभार्थीचे उत्पन्न रुपये ० ते ४० हजारचे दरम्यान असून गॅस न वापरणारांची संख्या २२ आहे.

ह्या सर्व विश्लेषणावरून कुटुंबांच्या आर्थिक स्थितीचा व गॅस वापरांचा निकटचा संबंध स्पष्ट होतो.

## प्रकरण--६

# निष्कर्ष

दारिद्र्य रेषेखालील आदिवासी कुटुंबांना गॅस किट वाटप या योजनेचा मुख्य उद्देश लाकूडतोड, वृक्षतोड थांबविणे, पर्यावरणाचे संतुलन राखणे, जमिनीची धूप थांबविणे, पर्जन्यवृष्टीत वाढ व त्यांच्या घरातील वातावरण धूरापासून मुक्त करणे हा होता. ह्या योजनेत दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना व विधवा व परित्यक्ता महीलांना प्राधान्याने लाभ द्यायचा होता. लाभार्थ्यास १४.२ कि.ग्रॅम सिलेंडर गॅस शेगडीसह जोडणी करून द्यायचे होते.

पाहणी केलेल्या लाभार्थीमध्ये विधवा व परीतक्त्याचे प्रमाण नगण्य असल्याचे दिसून आले.

लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील असल्याने स्वतःच्या उत्पन्नाचा १०% वाटा इंधनावर खर्च करणे त्यांना परवडत नाही. त्यामुळे दरमहा गॅस सिलेंडर भरून घेणे शक्य नसल्याने व थोड्या-फार अज्ञानामुळे गॅसचा वापर आदिवासीकडून केला जात नाही. गॅस मिळूनसुध्दा तो वापरण्याचे प्रमाण केवळ ३२% आहे.

गॅसचा वापर कमी प्रमाणात होत असल्याने त्यामुळे जंगलतोड, वृक्षतोड पूर्णपणे थांबण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. पारंपरीक पध्दतीनुसार आदिवासी कुटुंबे सुकलेला, वाळलेला, लाकूडफाटा गोळा करून आणतात व ते सरपण म्हणून वापरतात. त्यासाठी नेहमीच मुद्दाम होऊन वृक्षतोड केली जाते असे नाही . आदिवासीचे वास्तव्य डोंगराळ भागात असल्याने त्यांना सहजगत्या लाकूडफाटा उपलब्ध होतो. मात्र डोंगराळ भागातील वास्तव्यामुळे आदिवासींना गॅस सिलेंडर घरांच्या जवळपास उपलब्ध होऊ शकत नाही. तसेच त्यांना अनेक वेळा रोजगार मिळत नाही ह्या रिकाम्या वेळेत ते सरपण गोळा करतात व काही कुटुंबे लाकूडफाटा विक्रीचा व्यवसाय करतात. त्यासाठी त्यांना भांडवलाची गरज लागत नाही.

ज्या काही आदिवासी कुटुंबातून गॅसचा वापर होतो, सदर कुटुंबाचे उत्पन्न व रहाणीमान चांगले असल्याचे घरात गॅसच नव्हे तर टी.व्ही., फर्निचर, मोटार सायकल असल्याचे व ही कुटुंबे रस्त्यापासून जवळ रहात असल्याने निदर्शनास आले.

गॅस किट वाटप या योजनेचा वास्तविक उद्देश सफल झालेला नाही हे वास्तव आहे.

प्रकरण--७

## अडचणी व उपाययोजना

गॅस किट वाटप योजनेतील मुख्य अडचण म्हणजे जरी गॅस किट मोफत दिले तरी पुढे दरमहा करावा लागणारा खर्च आदिवासी कुटुंबांना पेलणे अवघड आहे ही होय. त्यामुळेच आदिवासी कुटुंबे गॅस वापर करण्यास राजी नाहीत. एखादे उत्पन्नाचे साधन किंवा रोजगार उपलब्ध होईल अशी योजना राबविण्याऐवजी ही खर्चीक बाब आमच्याकडे दिली आहे असे आदिवासींचे म्हणणे होते.

वास्तविक आदिवासीमध्ये नव्हे तर आजही ग्रामीण भागात काही अपवाद वगळल्यास लाकूड फाट्याचाच वापर केला जातो. ग्रामीण भागात रॉकेलचाही वापर अडी अडचणीलाच केला जातो. घरोघरी जनावरे असतात. त्यांच्या शेण्या, पालापाचोळा व लाकूडफाटा हेच इंधनाचे मुख्य साधन असते. अशा स्थितीत आदिवासीकडून तर दरमहा गॅससाठी खर्च केला जाण्याची शक्यताच फार कमी आहे.

पालापाचोळ्याच्या कोळशावर चालणाऱ्या शेगडीचा वापर किंवा गोबर गॅस किंवा सौरचूल ह्यांचा वापर इंधन म्हणून करणे प्रस्तावित केल्यास त्यावर खर्च करावा लागणार नसल्याने आदिवासी कुटुंबे त्याला प्रतिसाद देतील व अशा इंधनाचा वापर सुरू झाला तर लाकूडतोड थांबेल व आदिवासीवरही आर्थिक भार पडणार नाही.

तरी शासनाकडून अशा प्रस्तावांचा विचार प्राधान्याने केला जाणे संयुक्तिक ठरेल.

----------------

मुद्रणस्थळ - शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे-१



पिंपळनेर ता. साक्री येथे दि.४.८.०९ रोजी मा.मंत्री आदिवासी विकास तथा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांचे हस्ते १००% अनुदानीत गॅस युनिट संचाचे वितरण उपस्थिती-श्रीमती शैला वळवी प्रकाश अथिती, श्री. एन.टी. टेकाळे प्रा.व्य.,श्री.ए.बी. वडवी उप प्रा.व्य. व इतर मान्यवर



पिंपळनेर ता. साक्री येथे दि.४.८.०९ रोजी मा.मंत्री महोदय आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते गॅस युनिट संचाचे वाटप उपस्थिती-श्रीमती शैला वळवी प्रमुख अथिती, श्री. एन.टी. टेकाडे प्रा.व्य. नंदुरबार, श्री.ए.बी.वळवी उप प्रा.व्य. उप प्रा.कार्यालय पिंपळनेर.